
*मौलिक विचारमाला - ११*

## श्री गुलाबरावमहाराजांनी केलेली

# वेद : अपौरुषेयत्व-सिद्धी



**श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ, अमरावती**

**रु. ५**





## श्रीगुलाबराव महाराज : जीवन-आलेख

* श्री गुलाब गोंदुजी मोहोड / पाण्डुरंगनाथ / ज्ञानेश्वरकन्या.
* माता - पिता : श्री गोंदुजी व सौ. अलोकाबाई मोहोड.
* ६ जुलै १८८१, आषाढ.शु.१०. अमरावतीजवळ लोणीटाकळीत जन्म.
* चवथ्या महिन्यात अंधत्व / अल्पायुषी : वय चौतीस वर्षे.
* वयाची पहिली चार वर्षे माधानला वास्तव्य.
* इ. स. १८८५ : मातृवियोग
* त्यानंतरची सहा वर्षे आजोळी-लोणीटाकळीला वास्तव्य.
* या काळात प्रज्ञाचक्षुत्वाचा प्रत्यय.
* यांनतरचा इ. स. १९०० पर्यत माधानाच्या घरी वास्तव्य. या काळात दैवी गुणांचा उदय आणि सर्वज्ञतेचा परिचय. लोकांकडून ग्रंथ वाचवून घेण्यासाठी आत्यंतिक परिश्रम.
* इ. स. १८९६ : विवाह. पत्नी : सौ. मनकर्णिका.
* इ.स.१८९७ पासून निबंध व अभंगांची रचना, आनंदमार्ग खंडन. पितृवियोग
* इ. स. १९०० बालसवंगड्यांना अनुग्रह सिरसगाव, चांदूरबाजार, यावली इत्यादी ठिकाणी लोकोद्धारासाठी भ्रमंती. घरच्या विषप्रयोगादि कटकटींना कंटाळून आणि पाटीलकीवर पाणी सोडून गृहत्याग..
* इ. स. १९०१ श्रीज्ञानेश्वरमाउलीचा साक्षात् अनुग्रह.
* इ. स. १९०२ ग्वाल्हेरचे स्वानंदसाम्राज्यकर्ते जठारांना पत्र. त्यात —





* मानभाव, * डार्विन मतसमीक्षा, * स्पेन्सरमत समीक्षा.
* स्त्रीगीते : झोपाळा व जात्यावरील लोकगीतांची रचना.
* पंढरपूर यात्रा. * अमरावतीला आगमन.
* हरिभाऊ केवले या शिष्योत्तमाची भेट.
* इ. स. १९०३ - * कात्यायनी व्रताचा आरंभ. देउरवाडा
* इ.स.१९०४ - * पूर्वजन्ममरण- गुजरातेतील झिंजूवाडा येथील सत्पुरुष स्वामी बेचरानंद (इ.स.१७९५- १८८०)
* आर्वीचे सत्पुरुष दामोदर आपाजी महाराज यांची भेट.
* ज्ञानेश्वरीच्या निरुपणास आरंभ-
* उपलब्ध प्रतीत नसलेली ज्ञानेश्वरीतील ओवी सांगितली.
* माधुर्यामृतसागरास भरती, * विविध विषयावर निरूपणे,
* बालसवंगडी व पहिला शिष्य असलेल्या रामचंद्रबापूंना मृत्युसमयी पुढील महायात्रेसाठी दिलेल्या सूचना.
* आळंदीवारीचा आरंभ.
* स्त्रीव्रतांचा आरंभ. * रुक्मिणी स्वयंवराची रचना.
* इ. स. १९०५ - * महाराजांचा श्रीकृष्णाशी विवाह.
* श्रीकृष्णमूर्ती व ज्ञानेश्वरमाउलीच्या पादुकांची नित्यपूजा.
* प्रियशिष्य आणि उत्तराधिकारी नारायणराव पंडितांची भेट.
* मुलगा-अनंत यांचा जन्म.
* ल. रा. पांगारकरांची व लोकनायक बापूजी अणेंची भेट.
* इ. स. १९०७ - * नागपूर येथे ज्ञानेश्वर मुद्रणालयाची स्थापना, व ग्रंथछपाईला आरंभ.
* मायर्सच्या ग्रंथाची समीक्षा.





* वैज्ञानिक जगदीशचंद्र बोसांच्या ग्रंथांची समीक्षा.
* कलकत्ता येथे प्रा. प्रियनाथ मुकर्जीकडे मुक्काम.
* जगन्नाथपुरीयात्रा. * योगप्रभाव, चित्तोपदेश व सद्वैजयंती इ. ग्रंथांची रचना.
* शिवाच्या नित्य पार्थिवपूजनाचा आरंभ.
* प्रियलीलामहोत्सवादि ग्रंथांची रचना.
* इ. स. ९०९ -
* अंतर्विज्ञानसंहिता या यासूत्रग्रंथाची रचना व त्यातील ९ सूत्रांवर अलौकिक ९ व्याख्याने. वृन्दावनाची यात्रा.
* इ. स. १९१० - * डॉ. मुंजेना पत्र,
* न्याय वैशेषिकातून भौतिक विज्ञानासंबंधी मार्गदर्शन.
* पुण्याच्या साहित्यसम्राट न. चिं. केळकरांशी भेट.
* इस.१९११ ते १३
  विविध विषयांवर पत्रे,लेख व अनेक ग्रंथांची निर्मिती.
* इ. स. १९१४ - श्रीनिवृतिनाथांचा दृष्टांत,
* देवासच्या श्रीमंत तुकोबाराजे पवारांन पत्रे व देवासभेट.
* संगीतकार पंभातखंडेशी पत्राचार / गानसोपानाची रचना.
* धुळ्याचे सत्पुरुष बाबा गर्दे यांचेशी भेट.
* २० सप्टेंबर १९१५- भाद्रपद शु. १२ वामनद्वादशी रोजी पुणे मुक्कामी, चाकण ऑइलमिलच्या परिसरातील वास्तूत, शेवटच्या क्षणीं देखील, स्वतःच्या अनुभवाचा दाखला देऊन, शास्त्रनिष्ठेचा नारायण पंडितांना उपदेश केला आणि सूर्योदयाचे समयीं ब्रह्मस्थानी प्रस्थान केले.

**१.**

योग दर्शनानुसार

## वेदांचे अपौरुषेयत्व

वेद हे अपौरुषेय आहेत यासंबंधी सर्व वैदिक आणि आस्तिक दर्शनांनी प्रमाणे व युक्त्या देऊन आपले म्हणणे मांडले आहे. वेद ईश्वरप्रणीत आहेत. नित्य आहेत. ब्रह्मदेवाच्या मुखातून सृष्टीच्या आरंभी वेद उत्पन्न झाले. **'यस्य निश्वसितं वेदाः'** यासारखी अनेक प्रमाणे देऊन सिद्ध केले आहे. परंतु श्रीगुलाबराव महाराजांनी जुनी प्रमाणे व युक्ती यांच्या साह्याला अनुभवाची आणि युक्तीची जोड दिली आहे.





योगशास्त्रद्वारा प्रायोगिक पद्धतीने वेदांच्या अपौरुषेयत्वाचा, ईश्वरप्रणीतत्वाचा व नित्यतेचा कसा अनुभव घ्यावा याचे विवेचन करून योगशास्त्राच्या महत्वाच्या अंगावर प्रकाशझोत टाकला आहे.

*अनाहत नाद*

योग्यांना आणि ज्ञानमार्गियांना समाधीच्या स्थितीत अनाहत नाद ऐकू येत असतो. योग्यांनी **''शब्दावर धारणा-ध्यान-समाधिरूपी संयम''** केला म्हणजे अनाहत नादाचे दशविध प्रकार प्रथम ऐकू येतात, नंतर ॐकार ऐकू येतो. योग्याची केवळ निर्गुण उपासनाच असेल तर त्याला दहाप्रकारचा अनाहत नादच ऐकू येईल.





पण जर ईश्वरप्रणिधानपूर्वक संयम करणारा योगी असेल तर मात्र ॐकारानंतर वेदांचे मंत्र ऐकू येतात. हेच **'वेदांचे श्रवण'** होय.हे मंत्र अनंत आहेत. **'अनन्ता वै वेदाः'** त्यापैकी फारच थोडे ऋषींनी लोककल्याणासाठी प्रकट केले आहेत आणि बाकीचे सर्वसामान्य लोकांकरता अव्यक्तच आहेत.

सृष्टीच्या आरंभी ॐ कार ऐकू आला व नंतर ब्रह्मदेवाच्या मुखातून वेद प्रकट झाले. जर त्यांचा, लौकिक शब्दांप्रमाणे उत्पन्न होताच लय झाला असता तर, पुनः पुनः ऋषींना आणि योग्यांना ते वेद ऐकू आले नसते. परंतु वेद नित्य आहेत म्हणूनच वैदिक ऋषींना,





पौराणिक मुनींना, योग्यांना आणि संतसत्पुरुषांना समाधीमध्ये वेद जसेच्या तसे आजतागायत श्रवणीय आहेत. या सर्व विषयाचा उहापोह महाराजांनी 'योागप्रभाव' या ग्रंथात सविस्तर रीतीने केला आहे.

**''नाद हा कंठातून निघतो म्हणून जीभेच्या मूळाशी धारणा सांगितली आहे. तेथे शब्दावर धारणा केली असता प्रथम अनाहत नाद ऐकू येतो व पुढे ॐकार व नंतर दिव्यशब्द ऐकू येतात. हे दिव्यशब्द सार्थ असतात. हे नुसत्या धारणेचे फल झाले. पण पुढे हीच धारणा ईश्वराच्या प्रणिधानासह केली तर प्रथम ॐ कार दिव्य शब्द असल्यामुळे तोच ऐकू**

**येईल व नंतर श्रुती ऐकू येतील''** (योगप्रभाव पा.२४५-२४६) सर्व ऋषींनाही याच रीतीने श्रुती ऐकू आल्या.

भागवतात **'वृत्तिरोधाद्विभाव्यते'** म्हणजे धारणेने प्रणव ऐकू येतो असे म्हटले आहे.[४१]

अशा या ध्यानयोगानेच सर्वधर्मांचे संस्थापक ईश्वराचा साक्षात्कार करून घेऊन त्याची वाणी ऐकतात आणि नंतर लोकांच्या अधिकारानुसार वेगवेगळ्या धर्मांची स्थापना करतात.

विवेकानंदही असेच म्हणतात की **''सर्व धर्मांच्या प्रवृत्ती ध्यानयोगापासूनच प्रगट झाल्या आहेत.''**[४२]

* याप्रमाणे शब्दावर संयम केला





असता योगीभक्तांना अनाहत नाद वेदरूपाने ऐकू येतो. म्हणूनच वेदांना **'श्रुती'** (म्हणजे ऐकण्यास योग्य- किंवा ऐकलेल्या) असे सार्थ नांव दिलेले आहे.

* त्या श्रुती दिव्यदृष्टीने पाहिल्याही जातात म्हणून वेदांना पहाणाऱ्या ऋषींना **'द्रष्टे'** असे पारिभाषिक नांव आहे. ऋषी वेदांना पाहतात, ऐकतात व लोकहितार्थ प्रकट करतात, ते द्रष्टे होत.

* कोणीही केव्हाही योगाभ्यास करून वेदमंत्र ऐकू शकतात व पाहू शकतात म्हणून वेदमंत्र **'नित्य'** आहेत.

* हे मंत्र कोण्याही ऋषीने किंवा





जीवपुरुषाने रचलेले नाहीत म्हणूनच ते **'अपौरुषेय'** आहेत आणि **'अनाहत'** म्हणजे कोणीही आघात करून निर्माण न केलेले शब्द आहेत.

या सनातन वैदिक सिद्धान्तानुसार वेदांच्या नित्यतेचा योगमार्गद्वारा कसा अनुभव घ्याचा याचे सविस्तर विवेचन आणि मार्गदर्शन महाराजांनी योगप्रभाव ग्रंथात केले आहे. तसेच संप्रदायसुरतरूत ८ व्या अध्यायातील ओवीबंधात[४३] सूत्रबद्ध मांडणीही केली आहे.

**१)** योग्याच्या हृदयातील परमेश्वर हृदयाकाशात अनाहत नाद व नंतर श्रुती प्रकट करतो, तेव्हा प्रथम ओंकार व नंतर चारही





वेद ऐकूं येतात.

**२)** किंवा कुंडलिनी जागृत झाल्यानंतर स्वाधिष्ठान नामक चक्रावर योगी आरूढ झाला असता ब्रह्मदेव आपल्या चार मुखांनी चार वेद सांगत आहे, असा साक्षात्कार होतो.

**३)** किंवा कुंभक साधून ब्रह्मदेवाचे ध्यान हृदयात केले असता तेथेही अनाहतनाद व त्यातून सार्थ शब्दोत्पत्ती म्हणजेच वेद ऐकू येतात.

**वेदांचा तो अर्थ आम्हासचि ठावा ।**
**इतरांनी वाहावा भार माथा ॥**

या श्री तुकाराम महाराजांच्या उक्तीचा अर्थ आणि त्यातून सूचित होणारा सिद्धान्त

वरील प्रमाणेच आहे.

*महाराज आणि वेद*

स्वतः महाराज देखील वंशपरंपरेने संस्कारलोप झाल्यामुळे स्वतःला शूद्रत्व मानीत होते. त्यांना वेदाधिकार नव्हता. त्यांनी कोणाजवळ वेदपठण केले नाही किंवा वेद वाचूनही पाठ केले नाहीत. ते जवळ जवळ जन्मांध होते. त्यांच्यावर शिक्षणाचा संस्कार झाला नाही. इतके असूनही त्यांनी त्यांच्या वाङ्‌मयात जागोजाग वैदिक श्रुतींची प्रमाणे दिली आहेत. याचा अर्थ महाराजांनी वर मांडलेला स्वानुभूतीचा सिद्धान्तच बरोबर आहे असे निश्चित ठरते.





याप्रकारे योगाच्या धारणेने वेद प्रत्यक्ष होतात. श्रुतिरूपाने ऐकू येतात. म्हणूनच ते अपौरुषेय व नित्य आहेत. आजही कोणाची इच्छा असेल तर त्याने शास्त्रानुसार योगाचा प्रयत्न म्हणजे योगसाधना करावी व या सिद्धान्ताचा प्रयोगिक पडताळा- अनुभव घ्यावा. याप्रमाणे अनुभवप्रचुर युक्तिवादाने जुनाच सिद्धान्त जणुंकाय स्वतःचा नवा दृष्टान्त देऊन नवीन रीतीने महाराजांनी मांडला आहे. यातच त्यांचे वैशिष्ट्य आहे.

संदर्भ- टीपा

४०) योगप्रभाव पा. ४५१-४५६.

४१) समाहितात्मनो ब्रह्मन् बह्मणः परमेष्ठिनः।





हृद्याकाशादभून्नादो वृत्तिरोधाद्विभाव्यते ॥३७॥
ततो भूत् त्रिवृद् ओंकारो यो व्यक्तप्रभवः स्वराट्।
यत्तल्लिंगं भगवतो ब्रह्मणः परमात्मनः ॥ ३८॥
स्वधाम्नो ब्रह्मणः साक्षात् वाचकः परमात्मनः।
स सर्वमंत्रोपनिषद्वेदबीजं सनातनम् ॥४१॥
ततो क्षरसमाम्नायमसृजद् भगवानजः ॥४३॥
तेनासौ चतुरो वेदांश्चतुर्भिर्वदनैर्विभुः ... ॥४४॥
भागवत.

४२) योगप्रभाव पा. ७१.

४३) ... जो परमेश्वर हृदयनायक। तो अनाहत नादीं सम्यक। उपजवी श्रुती ॥४३३॥
तो प्रणव एक वेदू। तत्पर त्वद्गत-समष्टि-स्वप्नलोकसंबंधू। स्वाधिष्ठानचक्री ब्रह्मा विनोदू।





चारी वेद जे सांगे ॥४३४॥
तेचि ब्रह्मदेवाच्या मुखे करून। बोलिजे चतुर्वेद निर्माण। किंवा कुंभक करताक्षणी ब्रह्मयाचे ध्यान। हृदयीं बोलिले योगशास्त्री ॥४३५॥
तेथ जे अनाहतनादाची स्थिती।
सहावे अध्यायीं तात सांगती। तेथ जी होय शब्दोत्पत्ती। त्या जाण श्रुती तव हृदयीं ॥४३६॥
तूंचि तयाचां वक्ता व्यास। परी हा अवघा त्वत्समष्ट्यंश। तूं एक आपणास। देह मानिसी म्हणोनी ॥४३७ ते ४४१॥ संप्रदायसुरतरू, अ.८,पा.२७३.

४४) योगप्रभाव ३८.

०००

**२.**

पूर्वमीमांसा दर्शनानुसार

## वेदांची उत्पत्ती आणि नित्यता

''मीमांसकांच्या मताप्रमाणे वेदांना उत्पन्न करणारा पुरुष कोणीही नाही. वेदांचे अध्ययन गुरुपरंपरेने अनादि चाललेले आहे. ही सृष्टी अनादि आहे आणि अध्ययन परंपराही अनादि आहे. सृष्टीचा विच्छेद नाही म्हणून परंपरेचाही विच्छेद नाही. म्हणून वेद अपौरुषेय आणि नित्य आहेत'' असे निरीश्वर मीमांसक म्हणतात.

सेश्वर मीमांसेचे (म्हणजे वेदान्ताचे) म्हणणे वेगळे आहे. वेदांची उत्पत्ती सृष्टीच्या





आरंभी होते, असे वेदात सांगितले आहे. त्याचा अर्थ, वेदांची उत्पत्ती सृष्टीच्या आरंभी परमेश्वरच ब्रह्मदेवाच्या द्वारा करीत असतो, असा आहे. पूर्व कल्पातील वेदांचे स्मरण करून ब्रह्मदेव प्रत्येक कल्पारंभी त्यांचा पुनः ङ्गार करीत असतो. म्हणून वेद नित्य आहेत आणि सृष्टीच्या आरंभी त्यांचा पुनङ्गार होत असल्याने त्या पुनङ्गारालाच उत्पत्ती मानली गेली आहे.[६] **नैय्यायिक वेदाची मानिती उत्पत्ती । मीमांसक वेद नित्य मानिती । आम्ही म्हणतो सर्गादौ श्रीपती । वेद उत्पन्न करीतु ॥५३३॥ सर्गापासोनी प्रलयापर्यंत । वेद स्थायी सांगती भाष्यादि ग्रंथ । परी नवे नवे उपजवी भगवंत ।**





**कल्पी कल्पी हे न घडे ॥५३७॥ म्हणोनी तेचि पुढती पुढती । निर्माता होय विश्वपती । ऐसी वेदाची उत्पत्ती । आणि नित्यता-प्रतीती दोन्ही योग्य ॥५३९॥**

मीमांसक वेदांना 'नित्य ज्या प्रकाराने मानतात तो प्रकार उत्तरमीमांसेला म्हणजे वेदान्त्यांना संमत नाही. पण वेद सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वी ईश्वराचे ठिकाणी लीन असतात व सृष्टीच्या उत्पत्तीकाली ईश्वरच त्यांना व्यक्त करतो म्हणून ते 'नित्य' आहेत असे वेदान्त्यांचे मत आहे. सृष्टीच्या उत्पत्तीपासून प्रलयापर्यंत वेद स्थायी आहेत, असे भाष्याकारादि ग्रंथकारही म्हणतात.

**मीमांसक** वेद नित्य असल्यामुळे त्यांना





उत्पन्न करणारा कोणी नाही, असे म्हणून त्यांना 'अपौरुषेय' म्हणतात. आणि **वेदांती** मात्र वेद जीवाने निर्माण केले नाहीत म्हणून 'अपौरुषेय' मानतात. पण वेदांचे ईश्वरकर्तृत्व मात्र स्वीकारतात.

याप्रमाणे पूर्व आणि उत्तर मीमांसक हे दोघेही वेदांना नित्य आणि अपौरुषेय मानणारेच आहेत पण त्यांच्या समजुती भिन्न भिन्न आहेत येवढेच; असे महाराजांनी दाखवून दिले आहे. शेवटी त्यांच्याच शब्दात सांगावयाचे म्हणजे

**'ऐसी वेदांची उत्पत्ती ।**
**आणि नित्यताप्रतीती ।**
**दोन्ही योग्य ॥'**

*मंत्ररूप-देवतावादाचे व रूपक मानण्याचे खंडन*

मीमांसकांच्या मते मंत्रातील आहुती स्वीकारणाऱ्या देवता मंत्राहून भिन्न नाहीत, मंत्ररूपच आहेत. **'इंद्राय स्वाहा'** या मंत्राने दहाजणांनी, दहा ठिकाणी, एकाच वेळी, हवन केले तरी ते इंद्रालाच प्राप्त होते. जर एकच विग्रह असलेला इंद्र असता तर त्याने युगपत् (एकाच वेळी) दहा ठिकाणची आहुती कशी स्वीकारली असती? म्हणून मंत्ररूपच इंद्र आहे असे त्यांना मानावे लागले. ही आपत्ती टाळण्यासाठी मीमांसकांनी सर्व वैदिक देवता विग्रहवान् नसून मंत्ररूप आहेत असे गृहीत धरले आहे.

देवतांना मंत्ररूप मानल्यामुळे वेदातील





विग्रहरूपाने वर्णन केलेल्या देवतांच्या कथांना देखील 'रूपक' मानावे लागते. पण हे रूपक ठरविणे बरोबर नाही हे महाराजांनी संप्रदायसुरतरूत सविस्तर पटवून दिले आहे. देवतांच्या अंगी योगादि दिव्य सामर्थ्य असल्यामुळे त्या एकाच वेळी अनेक रूपे घेऊन हविर्भाव स्वीकारू शकतात आणि भक्तांवर अनुग्रह करू शकतात, असे ब्रह्मसूत्राच्या देवताधिकरण भष्यात भगवान शंकराचार्यांनी देखील स्पष्ट केले आहे.

याप्रकारे वैदिक देवतांच्या रूपकत्वाचा वाद अवैदिक ठरवून उत्तर मीमांसेने वेदातील इतिहास पुराणादिकात पूर्ण प्रमाण म्हणून





स्वीकारला आहे.[७]

*वेदातील इतिहास-कथा*

वेदांमध्ये देवतांच्या आणि राजांच्या कथा आहेत. आपणाला 'त्या घटना आपल्याच सृष्टीत घडलेला इतिहास आहे.' असे वाटते म्हणून त्या इतिहासानंतर वेद निर्माण झाले असे म्हटले जाते. पण महाराजांनी या मुद्याचे मार्मिक दृष्टांत देऊन युक्तिपूर्वक निराकरण करून वेदांचे व त्याबरोबरच त्यातील इतिहास-कथादिकांचे देखील नित्यत्व सिद्ध केले आहे.[८]

विधाता ब्रह्मदेव सृष्टीची उत्पत्ती मागील सर्गाप्रमाणे करीत असतो. **'धाता यथा पूर्वमकल्पयत्'** मागील सर्गात जे अवतार होतात किंवा जे अधिकारी म्हणून असतात तेच ते





अवतार आणि अधिकारी पुनःपुन्हा सत्य, त्रेता, द्वापार व कली या युगात क्रमशः होत असतात. रामकृष्णादी अवतार आणि इंद्र, वायू, वरुणादी सर्व अधिकारी देवता पुनः पुनः प्रत्येक सर्गात सारख्याच असतात. त्यांचे इतिहास जरी आपल्या मन्वंतरात घडले असले तरी मागील मन्वंतरात आणि पुढील मन्वंतरात ते सामान्यतः सारखेच घडत असतात.

प्रत्येक मन्वंतरात भिन्न भिन्न वायुदेवता आहेत. पण वेदातील वायुदेवतेचा उल्लेख, एखाद्या विशिष्ट युगातील वायुदेवतेसंबंधी नसून म्हणजे 'व्यक्तिसंबंधी' नसून 'सामान्यत्वाने' असतो.

वेदातील वायू या शब्दाने 'भूत, भविष्य, वर्तमान सर्व मन्वन्तरातील वायूदेवता' अभिप्रेत असतात. म्हणजे **वेदातील शब्दांचा अर्थ व्यक्तिवाचक नसून जातिवाचक असतो.** परमेश्वराचे ज्ञान व्यक्तीपुरते मर्यादित नसते त्यामुळे तिन्ही काळातील सर्व वायुदेवता 'वायू' या एकाच शब्दाने संबोधिल्या जातात. पण जीवाची तसे आकलन करण्याची शक्ती नसल्यामुळे आपण मात्र त्या शब्दाचा अर्थ 'जाती' न घेता 'विशिष्ट व्यक्तीच' घेत असतो.

– जसे गहू या शब्दाने पेरलेला गहू, ओला गहू, वाळलेला गहू, भूतकालातील नष्ट झालेला गहू आणि भविष्यकालातील गहू असे





गव्हाचे सर्व अर्थ अभिप्रेत आहेत. परंतु आपण मात्र 'गहू आण' या वाक्याचा अर्थ देश-काल-वस्तुमर्यादा असलेल्या अर्थानेच करीत असतो. पण परमेश्वराच्या वैदिक शब्दातील अर्थ मात्र त्रैकालिक असतो.

दुसरे उदाहरण – पावसाळ्यात गवत उगवते, हिवाळ्यात धान्य उगवते आणि उन्हाळ्यात आंबे होतात. पण आपण त्या शब्दांचा प्रयोग नित्यच करीत असतो. हिवाळ्यात आंबे नसतात पण शब्द आणि त्यांचे अर्थ मात्र कायमच असतात. शास्त्रज्ञांना अभ्यास करताना भूत भविष्य आणि वर्तमान या तिन्ही काळातील धान्याचा उल्लेख अभिप्रेत असतो. त्याचप्रमाणे





वेदातील शब्द नित्य अर्थाचे वाचक असतात. उदा.– 'भुज्यूला अश्विनीकुमारांनी समुद्रातून वाचविले' असा त्रेता युगातील इतिहास वेदांमध्ये आहे. हा इतिहास प्रत्येक त्रेता युगात घडत असल्यामुळे उल्लेख जातिवाचक आहे व्यक्तिवाचक नाही. म्हणून वेदात वर्णन केलेल्या त्या त्या इतिहासानंतर वेदांची निर्मिती झाली असे अनुमान काढणे चुकीचे आहे, असे महाराजांचे स्पष्ट मत आहे.

**'स भूरित्युक्त्वा भुवमसृजत्'** या वेदातील अन्तर्गत प्रमाणावरून तर असे दिसते की 'भू' असा शब्द ब्रह्मदेवाने उच्चारला व नंतर पृथ्वी उत्पन्न केली. ते उत्पत्तीचे कार्य 'यथा पूर्वम्' म्हणजे मागील सर्गाप्रमाणेच केले; म्हणूनच





असे म्हणावे लागते की वेद हे ईश्वराचे ठिकाणी नित्य आहेत. त्यातील 'भूमी' वगैरे शब्दांचा अर्थ आपल्याला माहीत असलेली भूमी येवढाच नसून तो शब्द वर्तमान-भूत-भविष्यादि त्रैकालिक भूमिवाचक आहे. म्हणूनच प्रलयानंतर भूमी उत्पन्न होण्यापूर्वी 'भूमी' शब्द परमेश्वराच्या कोशात होताच. तोच त्याने उच्चारला व नंतर भूमी उत्पन्न झाली.

**अनंतर कल्पी वायुदेवता । जितुक्या होती तत्वतां॥ त्या व्यक्ती मिळूनिया समस्ता । एक वायुदेवता वेदशब्द सांगे ॥४१७॥ म्हणोनी वेदी जे इतिहास । ते जातिवाचक शब्दांचे विशेष । एवं पूर्वोत्तरमीमांसाशेष । अर्थ जाहला ॥४१९॥**

**मंडणादिकांचे मती । सकळ शब्दार्थ होय जाती । परी आक्षेपे सांपडे व्यक्ती । अर्थ मूर्ती पुरुषाते[९] ॥४२०॥**

उदा.- जसे 'घट' हा शब्द उच्चारला असता भूत, वर्तमान व भविष्य सर्व घटांचा बोध होतो पण जीवास सर्व घटांना जाणण्याचे सामर्थ्य नाही म्हणून तिन्ही कालातील घट असा जातिवाचक अर्थ न घेता व्यक्तीचा बोध त्याला घ्यावा लागतो. एवढ्याकरता -

* जीवाने उच्चारलेल्या शब्दाचे ठिकाणी व्यक्तिवाचक शक्ती व * परमेश्वराने उच्चारलेल्या शब्दाचे ठिकाणी जातीवाचक शक्ती संबोधित असते, असे मानल्यास विरोध येत नाही.

परमेश्वराचे ज्ञान जाती व व्यक्तीस





युगपत् विषय करणारे असते म्हणून सर्वच व्यक्ती त्याला वर्तमान असतात. एवढ्याकरिता वेदांमध्ये व्यक्तीविशेषाचा इतिहास मानला असताही फारसे बिघडत नाही.[१०]

याप्रमाणे वेदातील देवता आणि इतिहास हे जातिवाचक असल्यामुळे वेदांच्या नित्यतेला मुळीच बाध येत नाही. हा विषय महाराजांनी अनेक ठिकाणी सविस्तर समजावून दिला आहे. जिज्ञासूंनी तो मुळातूनच समजावून घ्यावा यासाठीच हा लेखनप्रपंच !

०००





## पूर्वमीमांसा : संदर्भ टीपा

*(१)संप्रदायसुरतरु अ.७,पा.२८७*
*(२)संप्रदायसुरतरु अ.१३,पा.२७.२८*
*(३)प्रियलीलामहोत्सव अ.१०,ओवी ६७-७१*
*(४)संप्रदायसुरतरु अ.८. पा.२५५*
*(५)संप्रदायसुरतरु अ.२१ पा.२६४*
*(६)संप्रदायसुरतरु अ.८ पा.२८५-२८६*
*(७)विविध लेखसंग्रह श्रीबाबाजीमहाराज पंडित- यज्ञीय हिंसा*
*(८)संप्रदायसुरतरु अ.पा.२६३-२६४*
*(९)संप्रदायसुरतरु पा.२६३-२६४*
*(१०)संप्रदायसुरतरु २६३-२६४*
*(११)संप्रदायसुरतरु अ.२.पा.८४*
*(१२)संप्रदायसुरतरु अ.२.पा.८९*
*(१३)संप्रदायसुरतरु अ.२.पा.६७*
*(१४)स्कंदपुराण मार्गशीर्षमाहात्म्यअ.१५ श्लो५२*
*(१५)संप्रदायसुरतरु अ.२,पा.६८*
*(१६)संप्रदायसुरतरु अ.१३,पा.२८-६८*





*(१७)विविधलेखसंग्रह-श्रीबाबाजीमहाराज पंडित पा.४२*
*(१८)विविध लेखसंग्रह पा.३३*
*(१९)सौत्रामण्यां सुरां पिबेत्*
*(२०)ऋतौ भार्यामुपेयात्*
*(२१)संप्रदायसुरतरु अ.१३ पा.३६*
*(२२)संप्रदायसुरतरु अ.१३.पा.३६*
*(२३)विविधलेखसंग्रह प.४८*
*(२४)संप्रदायसुरतरु अ.१३.पा.३७-३८*
*(२५)विविधलेखसंग्रह पा.४८*